॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

✻ सुविचार ✻
कर्माचा आवाज
शब्दांपेक्षा मोठा असतो.

■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. ४ ऑगस्ट २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ५८ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

# राज्यात आज मुसळधार पावसाचा अंदाज

## भारतीय हवामान विभागाचा मोठा इशारा । सातारा, पुणे, कोल्हापुरला अलर्ट

● **मुंबई । वीरभूमी –**
राज्यात गेल्या काही दिवसांपासून पाऊस कमी अधिक प्रमाणात कोसळत आहे. त्यामध्येच आज भारतीय हवामान विभागाने पावसाचा मोठा इशारा दिला. सातारा, पुणे आणि कोल्हापूरमध्ये आज पावसाचा मोठा इशारा देण्यात आला. विदर्भात विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याचा अंदाज आहे.



भारतीय हवामान विभागाने आज सातारा, पुणे, कोल्हापूर घाटमाथ्यावर मोठ्या पावसाचा इशारा दिला. भंडारा, गोंदिया, गडचिरोली, वर्धा, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला. मुंबईमध्येही पावसाची शक्यता आहे. रात्रभर अनेक भागात पाऊस झाला. त्यातच आता पुन्हा एकदा पावसाचा इशारा देण्यात आला. विदर्भात पावसाचा हाहाकार उडाला आहे. सतत पाऊस कोसळत आहे.

हवामान विभागाने प्रसिद्धीपत्रक जारी करून म्हटले की, ६ ते ९ ऑगस्ट दरम्यान पश्चिम मध्य प्रदेशात ताशी ३० ते ४० किमी वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांसह वादळी पावसाची शक्यता आहे. त्याचबरोबर ५ ते ९ ऑगस्ट दरम्यान पूर्व मध्य प्रदेशात आणि ४ ते ९ ऑगस्ट दरम्यान देशातील विविध राज्यात मुसळधार पाऊस होईल.

बुलडाणा जिल्ह्यात दोन दिवसांत झालेल्या अतिवृष्टीने बहुतांश नद्या- नाले वाहू लागले. १३ पैकी ११ तालुक्यांतील ९१ महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली. मात्र, या पावसाचाही जिल्ह्यातील सर्वात मोठ्या खडकपूर्णा प्रकल्पाच्या जिवंत जलसाठ्यावर कोणताही परिणाम झालेला नाही. धरणातील जिवंत जलसाठा अद्याप शून्य टक्के असून, प्रकल्पाला जीवनदान देणाऱ्या मराठवाडा भागात अपेक्षित पाऊस न झाल्याने पाणीसाठ्यात वाढ झालेली नाही.

सध्या केवळ धामणा नदीला प्रवाह सुरू झाला असला, तरी खडकपूर्णा धरण अद्याप पावसाच्या प्रतीक्षेतच आहे.. ऑगस्ट महिना सुरू झाला असला तरी शून्य टक्के जलसाठा असल्याने चिंता व्यक्त होत आहे.. २४ तासांत झालेल्या पावसामुळे धरणात केवळ २०० दशलक्ष घनमीटर पाण्याची आवक झाली आहे. त्यामुळे धरणात पाण्याची आवक वाढण्यासाठी अजून पावसाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

कोकणात पाऊस सुरू आहे. नदी क्षेत्रात समाधानकारक पाऊस होतोय. त्यामुळे जिल्ह्यातील नद्या दुथडी भरून वाहत आहेत. खेडमधील जगबुडी नदी इशारा पातळीच्यावर गेली. खेडमधील जगबुडी नदीची पातळी ५.४० मीटर. कोकणात पावसाचा जोर कमी, पुढील तीन दिवसांसाठी हवामान विभागाने पावसाचा येलो अलर्ट जारी केला.

## SPOT NEWS

### २५ हजार मूळ वेतन असणाऱ्यांना पेन्शन मिळणार!

● **नवी दिल्ली –** ईपीएफओ अतंर्गत ईपीएफच्या पगाराची मर्यादा वाढविण्याच्या प्रस्तावाला वित्त मंत्रालयाकडून मंजुरी देण्यात आली. १५ हजार रुपयांवरुन ती रक्कम २५ हजार रुपये करण्याचा निर्णय केंद्र सरकारच्या कॅबिनेटने मंजुरी दिल्यानंतर तो लागू होईल. अजून या निर्णयाला केंद्रीय कॅबिनेटची मंजुरी मिळणे बाकी आहे. ईपीएफओच्या नियमांनुसार ज्या कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन १५ हजार रुपयांपर्यंत असते, त्यांना पीएफ कॉन्ट्रिब्यूशन अनिवार्य असते. १५ हजारांपेक्षा अधिक मूळ वेतन असणाऱ्या कर्मचाऱ्यांना हा नियम लागू नसतो. मात्र, केंद्रीय वित्त मंत्रालयाकडून याची मर्यादा २५ हजार रुपये करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे मोठ्या संख्येने नोकरदार लोक ईपीएफ आणि पेन्शनच्या कक्षेत येतील. केंद्रीय वित्त मंत्रालयाकडून ईपीएफओच्या पगाराची मर्यादा वाढविण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. यात १५ हजार रुपयांच्या मूळ वेतनाची मर्यादा वाढवून २५ हजार रुपये पगार असणाऱ्यांना पीएफ आणि पेन्शनच्या कक्षेत आणण्याची तयारी करण्यात आली आहे. सुरुवातीला ही मर्यादा ३० हजार रुपये करण्याचा विचार होता. मात्र, वित्त मंत्रालयाकडून ही मर्यादा २५ हजार रुपये करण्यास मंजुरी देण्यात आली. आता कॅबिनेटच्या बैठकीत मंजुरी मिळाल्यानंतर हा निर्णय लागू करण्याची तारीख जाहीर केली जाऊ शकते.

### ई २० पेट्रोल विरोधात २ लाख नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन

● **नवी दिल्ली –** भारतात सक्तीच्या करण्यात आलेल्या ई २० पेट्रोल (इथेनॉल मिश्रण) धोरणाविरोधात आप चे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल आक्रमक झाले आहेत. इंधनाच्या या मुद्यावरून अरविंद केजरीवाल यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दबावाखाली येऊन मोदी सरकार हे इथेनॉल-मिश्रित इंधन जनतेवर लादत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. या धोरणाविरोधात मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानावर जाऊन आपण स्वत: निवेदन देणार असल्याची घोषणा केजरीवाल यांनी केली. अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीत माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, लोकांच्या वाहनांचे नुकसान होत असूनही सरकार या इंधनाचा आग्रह धरत आहे. यामागे नक्कीच सरकारचा काहीतरी छुपा अजेंडा आहे. पंतप्रधान मोदी हे ट्रम्प यांच्या दबावाखाली अमेरिकेकडून इथेनॉल खरेदी करत आहेत, अशी लोकांमध्ये चर्चा आहे.

## घटनेतील दुरुस्त्यांबाबत कागदपत्रे सादर करा
### राष्ट्रवादीच्या सुनेत्रा पवार यांना निवडणूक आयोगाचे पत्र

● **मुंबई । वीरभूमी –**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना केंद्रीय निवडणूक आयोगाने पत्र पाठवले असून, पक्षाच्या घटनेमधील दुरुस्त्यांसंदर्भातील आवश्यक कागदपत्रे आणि प्रस्ताव सादर करण्यास सांगितले आहे. निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या घटनेतील अनेक बदलांना समर्थन देणारी आवश्यक कागदपत्रे आणि प्रस्ताव सादर करण्यात आला नसल्याचा उल्लेख पत्रात केला आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसने राष्ट्रीय कार्यकारिणी बोलावून सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड केली होती. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मते २६ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या ठरावात केवळ कलम १८ (१) मध्ये दुरुस्तीचा उल्लेख आहे. तथापि, पक्षाने कलम ६, ७, १२, ३२ आणि ३६ मध्येही बदल केले आहेत. या बदलांना मान्यता देणारे प्रस्ताव आयोगाला प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला आयोगाकडून या दुरुस्त्यांच्या समर्थनार्थ वैध कागदपत्रे आणि प्रस्ताव लवकरात लवकर सादर करावेत, असे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, निवडणूक आयोगाने पाठविलेल्या पत्रात राष्ट्रवादी काँग्रेसच्या घटनेत कलम ६, ७, १२, १८, ३२ आणि ३६ मध्ये बदल करण्यात आले. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसने केवळ कलम १८ संदर्भातील २६ फेब्रुवारी २०२६ च्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या ठरावांचा समावेश आहे. इतर कलमांसंदर्भातील ठराव आणि बदला संदर्भातील कागदपत्रे जमा करावीत, असे निवडणूक आयोगाने पत्रात म्हटले आहे.

## रतनवाडीत घराची दगडी भिंत कोसळून ८ महिन्यांच्या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू
### आई गंभीर जखमी, राजूर पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू

● **अकोले । वीरभूमी –**
आदिवासी दुर्गम भागातील रतनवाडी येथे राहत्या घराची दगडी भिंत मध्यरात्री अचानक कोसळून सृष्टी अशोक झडे (वय ८ महिने) या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्घटनेत तिची आई सोनाली अशोक झडे गंभीर जखमी झाली असून परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अशोक झडे यांच्या घराच्या पश्चिम बाजूची दगडी भिंत अचानक कोसळली. त्यावेळी गाढ झोपेत असलेल्या सृष्टी व तिची आई सोनाली यांच्या अंगावर दगड व मातीचा ढिगारा पडला. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी तत्काळ मदतकार्य सुरू करून दोघींना राजूर येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर सृष्टीला मृत घोषित केले. सोनाली झडे यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी राजूर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार व त्यांचे सहकारी पुढील तपास करीत आहेत.

या हृदयद्रावक घटनेमुळे झडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून अकोले तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.

## ९ कोटी ४९ लाखांच्या फसवणूक प्रकरणात राज्य बाजार समिती सभापती बाळासाहेब नहाटा ताब्यात
### आर्थिक गुन्हे शाखेची श्रीगोंदा पोलिसांच्या मदतीने कारवाई

● **श्रीगोंदा । वीरभूमी–**
पुणे शहरातील डेक्कन पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांक ७८/२०२५ मधील ९ कोटी ४९ लाख ३५ हजार रुपयांच्या फसवणूक प्रकरणातील पाहिजे आरोपी प्रवीणकुमार ऊर्फ बाळासाहेब नहाटा यांना श्रीगोंदा पोलिसांच्या मदतीने आर्थिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले.



या प्रकरणात फिर्यादी व साक्षीदारांची एकूण ९ कोटी ४९ लाख ३५ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. नहाटा हे सुमारे एक वर्षापासून तपास यंत्रणेला मिळून येत नव्हते. त्यामुळे त्यांच्या विरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आले होते.

श्रीगोंदा पोलिसांच्या मदतीने नहाटा यांना ताब्यात घेतल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर करीत आहे. नहाटा हे राज्य बाजार समितीचे विद्यमान सभापती असून यापूर्वी त्यांनी श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती म्हणूनही काम पाहिले आहे. राजकीय क्षेत्रात त्यांचे मोठे वलय असून, यापूर्वी विविध प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या विरोधात हद्दपारीसंदर्भात चार नोटिसा बजावण्यात आल्याची माहिती आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चेतन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.



# पारनेरच्या भीमाशंकर मंदिराचा शिलालेख उलगडतो देवालयनिर्मितीचा इतिहास

## आवजी पाटील यांचे पुत्र खंडोजी पाटील यांनी स्वतःच्या पदरीच्या द्रव्याने मंदिर उभारल्याची ऐतिहासिक नोंद

■ विजय उंडे

● **अहिल्यानगर । वीरभूमी –** जिल्ह्यातील पारनेर शहराला प्राचीन धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा लाभला आहे. या वारशाची साक्ष देणारा पारनेर येथील पूर्व वेशीजवळ मध्यवस्तीत असलेल्या भीमाशंकर महादेव मंदिराच्या गाभारा प्रवेशद्वारावरील शिलालेख नुकताच इतिहासप्रेमी आणि शिलालेख अभ्यासकांसाठी महत्त्वाचा पुरावा ठरत आहे. या शिलालेखातून सन १८४३ मध्ये खंडोजी पाटील यांनी स्वतःच्या पदरीचे द्रव्य खर्च करून भीमाशंकर महादेवांचे देवालय उभारल्याची नोंद समोर येते.

हा शिलालेख मंदिराच्या गाभारा प्रवेशद्वाराच्या मध्यभागी वरील बाजूस कोरलेला आहे. उठाव स्वरूपातील हा सहा ओळींचा शिलालेख देवनागरी लिपीत आणि मराठी भाषेत आहे. मात्र, वातावरणाचा परिणाम, मोठ्या प्रमाणात झालेली रंगरंगोटी आणि शिळेवर आलेला सिमेंटचा थर यामुळे लेखातील अनेक अक्षरे अस्पष्ट झाली आहेत. विशेषतः सहावी ओळ मोठ्या प्रमाणात खराब झाली असून, छाप घेतल्यानंतर काही प्रयत्नांनी लेखाचा मजकूर वाचता येतो.

शिलालेखातील ओळी

१.।।श्रि गणेशाय नमः।। श्री पाराशर क्षेत्रि भीमाशंकर म्हा

२.।।णोनि महादेव।। तच्चरणितत्पर हा अवटि अरति धरू।।

३.।।नि पात्राव।।१।। शक सत्राशे पासटवत्सर हा शोभ कृतनामा

४.।।ने।। यासालिकेले हे देवालय कृत्ययास्यश्रमाने।।२।।खंडोजी

५.।।सुत अवजी पाटिलहा पारनेर नगरीचा।।पदरीचे द्रव्याने केला

६ (अक्षरे अस्पष्ट आहेत)

या वाचनावरून लेखाची सुरुवात श्री गणेशाय नमः या मंगलाचरणाने होत असल्याचे दिसते. त्यानंतर पाराशर क्षेत्रातील भीमाशंकर महादेवांचा उल्लेख असून, महादेवांच्या चरणी तत्पर राहून धार्मिक सेवा करण्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे.

शिलालेखातील सर्वांत महत्त्वाची नोंद म्हणजे शालिवाहन शक १७६५, शोभकृत नाम संवत्सर, म्हणजेच सन १८४३ या कालखंडात भीमाशंकर महादेवांचे देवालय उभारण्यात आल्याची नोंद होय. हे देवालय पारनेर नगरीतील आवजी पाटील यांचे पुत्र खंडोजी पाटील यांनी स्वतःच्या पदरीचे द्रव्य खर्च करून मोठ्या परिश्रमाने उभारल्याचे लेखातून स्पष्ट होते.

या शिलालेखातील तच्चरणी तत्पर हा उल्लेख तत्कालीन समाजातील धार्मिक श्रद्धा आणि देवसेवेची भावना अधोरेखित करणारा आहे. देवालयाची निर्मिती ही केवळ धार्मिक बाब नसून त्या काळातील सामाजिक जीवनाचा आणि स्थानिक नेतृत्वाचा महत्त्वाचा भाग होती, याचीही साक्ष या लेखातून मिळते.

विशेषतः पदरीचे द्रव्याने केला हा उल्लेख अत्यंत महत्त्वाचा आहे. मंदिराच्या उभारणीसाठी खंडोजी पाटील यांनी स्वतःच्या खर्चातून निधी दिल्याची नोंद यात आहे. त्यामुळे तत्कालीन काळातील देवालयनिर्मिती, धार्मिक कार्यासाठी वैयक्तिक संपत्तीचा वापर आणि स्थानिक प्रतिष्ठित व्यक्तींचे सामाजिक योगदान यावर प्रकाश पडतो.

शिलालेखात पाटील या पदनामाचा उल्लेख असल्याने तत्कालीन स्थानिक सामाजिक रचना आणि गावव्यवस्थेतील पाटील घराण्याचे स्थानही अधोरेखित होते. त्यामुळे हा लेख केवळ मंदिरनिर्मितीची माहिती देणारा धार्मिक पुरावा नसून स्थानिक सामाजिक इतिहासाच्या अभ्यासासाठीही महत्त्वाचा ठरतो.





शिलालेखात पारनेरचा उल्लेख पाराशर क्षेत्र असा करण्यात आला आहे. त्यामुळे पारनेरच्या तत्कालीन धार्मिक ओळखीवरही या शिलालेखातून प्रकाश पडतो. श्री गणेश आणि श्री भीमाशंकर महादेवांचा उल्लेख असल्याने या परिसरातील धार्मिक परंपरा आणि शैव उपासनेचे महत्त्व अधोरेखित होते.

कालनोंद हा या शिलालेखाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. शके १७६५, शोभन नाम संवत्सर, सन १८४३ अशी नोंद असल्याने मंदिरनिर्मितीचा कालखंड निश्चित करण्यासाठी हा लेख महत्त्वाचा ऐतिहासिक पुरावा ठरतो. एकोणिसाव्या शतकातील पारनेरचा धार्मिक आणि सामाजिक इतिहास समजून घेण्यासाठी अशा स्थानिक शिलालेखांचे महत्त्व मोठे आहे.

आज हा ऐतिहासिक शिलालेख रंगरंगोटी, सिमेंटचा थर आणि वातावरणाच्या परिणामामुळे झाकोळला गेला आहे. अनेक अक्षरे अस्पष्ट झाली असून सहावी ओळ मोठ्या प्रमाणात खराब झाली आहे. त्यामुळे भविष्यात या शिलालेखाचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन, स्वच्छता आणि दस्तऐवजीकरण होणे आवश्यक आहे. अशा पुराभिलेखांचे जतन झाल्यास स्थानिक इतिहासाच्या अनेक अज्ञात पैलूंवर प्रकाश पडू शकतो.

पारनेरच्या भीमाशंकर महादेव मंदिरातील हा शिलालेख म्हणजे १८४३ मधील धार्मिक श्रद्धा, मंदिरनिर्मितीची परंपरा, स्थानिक नेतृत्व आणि सामाजिक योगदान यांचा दगडावर उमटवलेला ऐतिहासिक ठसा आहे. पारनेरच्या इतिहासाचा अभ्यास करताना या शिलालेखाकडे केवळ मंदिरातील लेख म्हणून नव्हे, तर तत्कालीन समाजजीवनाचे महत्त्वपूर्ण ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून पाहणे गरजेचे आहे.

या शिलालेखाचे संशोधन माहिती, संकलन व वाचन पुणे येथील अनिल किसन दुधाणे यांनी सतीश सोनवणे व डॉ. शैलेंद्र भांडारे यांच्या सहकाऱ्याने केले आहे.

# SPOT NEWS

## सह्याद्री चौकात लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांची जयंती उत्साहात

● **अहिल्यानगर । वीरभूमी –** साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त सह्याद्री चौक, एमआयडीसी येथे सत्यशोधक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाउंडेशन आणि कामगार संघटना, एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. अबीर-गुलालाची उधळण, राष्ट्रभक्तीपर घोषणांचा जयघोष आणि उत्साहपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे एपीआय थोरात यांनी लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर महाप्रसाद वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन उद्योजक बाळासाहेब मोरे यांनी केले. महाप्रसादाची व्यवस्था अनिलशेठ नागरगोजे यांनी केली असून सुनीलशेठ मुनोत यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी अहिल्यानगर महानगरपालिकेचे नगरसेवक बाबासाहेब नागरगोजे, केशवशेठ नागरगोजे, मेजर निळकंठ उल्हारे, अनिलशेठ भिंगारे, सरपंच बबन डोंगरे, ग्रामपंचायत सदस्य बंडूनाना सप्रे, संजय भोर, खंडारे दाजी, नाथाभाऊ आल्हाट, जयश्री गायकवाड, ज्योती साठे, कल्याणी गोरखे, रमेश भिंगारदिवे, पोपट वैरागर, बाबू भाकरे, वाल्हेकर मामा तसेच कामगार संघटनेचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

## घरफोडी करून वृद्धेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र लंपास

● **पाथर्डी । वीरभूमी –** पाथर्डी तालुक्यातील माळीबाभुळगाव येथे अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून वृद्ध महिलेच्या गळ्यातील सुमारे २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रकाश गोरख दिवटे (वय २१, रा. माळीबाभुळगाव, ता. पाथर्डी) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. घटनेतील माहितीनुसार, २ ऑगस्टच्या रात्री घरातील सर्वजण जेवण करून झोपले होते. आजी आशाबाई या घराच्या अंगणात झोपल्या होत्या. दरम्यान, ३ ऑगस्ट रोजी पहाटे सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास आजींच्या आवाजामुळे घरातील सदस्य जागे झाले. त्यांनी पाहिले असता घराचा दरवाजा आतून बंद असून बाहेरून कडी लावलेली होती. नातेवाईकांच्या मदतीने दरवाज्याची कडी काढल्यानंतर घरातील सदस्य बाहेर आले. यावेळी आजी आशाबाई यांच्या गळ्यातील सुमारे ५ ग्रॅम वजनाचे व २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## फिनिक्सच्या नेत्र तपासणी शिबिरातून गरजूंवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

● **अहिल्यानगर । वीरभूमी–** सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवेच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नगर तालुक्यातील नागरदेवळे येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमातून तपासणी झालेल्या रुग्णांपैकी २२ ज्येष्ठ नागरिकांवर मोफत मोतीबिंदू व काचबिंदूच्या शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या. तसेच शिबिरात रक्तदाब, मधुमेह आणि इतर आरोग्य तपासण्यांचीही मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात पार पडलेल्या या शिबिराचे उद्घाटन नगरसेवक तथा केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत, संस्था गेल्या अनेक वर्षांपासून आरोग्य क्षेत्रात निस्वार्थ भावनेने उल्लेखनीय सेवा देत असल्याचे सांगितले. दत्ता गाडळकर म्हणाले की, अशा उपक्रमांमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचे कार्य ही संस्था सातत्याने करत आहे.

## चापडगाव विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

### गुरूंचा आदर करून ज्ञानाच्या बळावर जीवनाची वाटचाल करा : विष्णू महाराज गोर्डे

● **शेवगाव । वीरभूमी–** गुरू-शिष्य परंपरा ही भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा आहे. विद्यार्थ्यांनी गुरूंचा आदर करून त्यांच्याकडून योग्य ज्ञान ग्रहण करत जीवनाची यशस्वी वाटचाल करावी, असे प्रतिपादन ह.भ.प. विष्णू महाराज गोर्डे यांनी केले.



चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित गुरुपौर्णिमा कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य संपत दसपुते, उपप्राचार्य सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, शिक्षक विष्णू दळे, भारत म्हस्के आदी उपस्थित होते.

प्राचार्य संपत दसपुते, विष्णू दळे आणि भारत म्हस्के यांनी आपल्या मनोगतात गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व विविध उदाहरणे व दृष्टांतांच्या माध्यमातून स्पष्ट केले.

मुख्य कार्यक्रमात प्रत्येक वर्गाच्या प्रतिनिधींनी आपल्या गुरूंचे औक्षण करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांनीही गुरूंबद्दल आदरभाव व्यक्त करत कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सर्जेराव निकाळजे यांनी केले. प्रभाकर मराठे यांनी अनुमोदन व्यक्त केले, तर आभार देवेंद्र लांडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# बायरचे 'झिवाना स्मार्ट' पुढील पिढीचे बुरशीनाशक बाजारात

## डाऊनी मिल्ड्यू, लेट ब्लाइटवर प्रभावी नियंत्रण । द्राक्ष, टोमॅटो, बटाटा व काकडीवर्गीय पिकांना संरक्षण

● **अहिल्यानगर । वीरभूमी –** बायर कंपनीने 'बायर झिवाना स्मार्ट या आपल्या नवीनतम बुरशीनाशक उत्पादनाच्या प्रारंभाची घोषणा केली. हे उत्पादन केवडा डाऊनी मिल्ड्यू आणि लेट ब्लाइट अशा विनाशकारी रोगांपासून उच्च-मूल्याच्या फळबाग पिकांचे संरक्षण करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. एफआरएसी गट ४९ अंतर्गत असलेल्या नवीन सक्रिय घटकाच्या साहाय्याने झिवाना स्मार्ट द्राक्षे, काकडीवर्गीय पिके, बटाटा आणि टोमॅटोमध्ये उत्कृष्ट रोग नियंत्रण प्रदान करते. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकाची गुणवत्ता जपण्यास, उत्पादकता सुधारण्यास आणि परतावा वाढविण्यात मदत होते.




डाऊनी मिल्ड्यू आणि आणि लेट ब्लाइट हे फळबाग पिकांवर परिणाम करणाऱ्या सर्वात विनाशकारी रोगांपैकी आहेत आणि अनेकदा शेतकऱ्यांच्या पीक संरक्षण खर्चापैकी जवळपास निम्मा खर्च याच रोगांवर होतो. बदलत्या हवामानामुळे आणि दीर्घकाळच्या आर्द्रतेमुळे रोगांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शेतकऱ्यांना अशा नाविन्यपूर्ण उपायांची आवश्यकता आहे जे शाश्वत शेती पद्धतींना पाठिंबा देताना विश्वसनीय आणि दीर्घकाळ टिकणारे संरक्षण प्रदान करतील.

झिवाना' स्मार्ट आपल्या आधुनिक कार्यपद्धतीने या आव्हानाला सामोरे जाते जी ऊमायसीट रोगांविरुद्ध सर्वोत्तम कामगिरी करते. हे द्रावण पावसाळी परिस्थितीतही सरासरी ७ ते १४ दिवस टिकणाऱ्या संरक्षणासह उत्कृष्ट परिणामकारकता प्रदान करते. पावसाचा परिणाम न होण्याचा त्याचा गुणधर्म आणि आधीच अस्तित्वात असलेली पाने व नवीन वनस्पतींची वाढ या दोन्हींचे संरक्षण करण्याची क्षमता, शेतकऱ्यांना संपूर्ण पीक चक्रात रोगांचा प्रादुर्भाव अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापित करण्यास सक्षम करते.




या उत्पादनाच्या शुभारंभाबाबत बोलताना बायरच्या पीक विज्ञान विभागाचे भारतातील मुख्य कार्यकारी अधिकारी मोहन बाबू म्हणाले: भारताच्या पोषण सुरक्षेसाठी आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी फलोत्पादन हे केंद्रस्थानी आहे. 'झिवाना' स्मार्टच्या माध्यमातून बायर एक विज्ञानकेंद्री नवसंशोधन आणत आहे. ते फलोत्पादक शेतकऱ्यांना रोगांच्या गुंतागुंतीच्या समस्यांचे व्यवस्थापन करण्यास, पिकांची गुणवत्ता जपण्यास आणि अधिक लवचिक व शाश्वत अन्नप्रणाली तयार करण्यास मदत करते.

'झिवाना स्मार्ट हे महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान, आसाम, आंध्रप्रदेश आणि पंजाब यांसारख्या प्रमुख फलोत्पादन करणाऱ्या प्रदेशांमध्ये उपलब्ध होईल.

झिवाना' स्मार्ट हे उत्पादन शेतकऱ्यांना लवचिकता, उत्पादकता आणि शाश्वत कृषी परिणामांसाठी उपयुक्त नावीन्यपूर्ण पीक संरक्षण उपायांसह सक्षम करण्याच्या बायरच्या वचनबद्धतेला अधिक दृढ करते.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# घरफोडीतील पसार आरोपी जेरबंद

## श्रीगोंदा पोलिसांची धडाकेबाज कारवाई । आरोपीला पाच दिवसाची पोलिस कोठडी



छाया । विजय उंडे

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

मोहितेवस्ती, पारगाव सुद्रीक येथे घरफोडी करून रोख रक्कम, सोन्याचे दागिने व मोबाईल असा एकूण ६८ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेणाऱ्या आरोपीला श्रीगोंदा पोलिसांनी अखेर जेरबंद केले. संदेश संजय भोसले (रा. कोळगाव, ता. श्रीगोंदा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

दि. १५ जून रोजी रात्री १० ते १६ जून रोजी पहाटे २.३० वाजण्याच्या दरम्यान पंडीत गणपत मोटे यांच्या घराची बाहेरून लावलेली कडी उघडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. घरातील रोख रक्कम, सोन्याचे दागिने व मोबाईल असा ६८ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला होता. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार अविनाश काटकर यांच्याकडे सोपविण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी गुप्त बातमीदारांचे जाळे सक्रिय करण्याबरोबरच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा शोध सुरू केला. त्यातून सदर गुन्ह्यात संदेश भोसले याचा सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. आरोपी कोळगावच्या शिवारात स्वतःचे अस्तित्व लपवून बसल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याच्याकडून चोरीस गेलेला ओपो ए-७८ कंपनीचा मोबाईल हस्तगत करण्यात आला असून त्याचा पंचनामा करण्यात आला आहे.

आरोपीला दि. ३१ जुलै रोजी रात्री ८.३८ वाजता अटक करण्यात आली. दि. १ ऑगस्ट रोजी त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. चोरीस गेलेल्या उर्वरित मुद्देमालाबाबत तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, पोहेकॉ. अविनाश काटकर, देविदास पळसे, राहुल मोढळे, गणेश मैड, गोरक्षनाथ अडागळे, सचिन गोरे, संदिप राऊत, मयुर तोरडमल, विवेक दळवी तसेच दक्षिण विभाग मोबाईल सेलचे पोलीस कर्मचारी राहुल गुंडू व अरुण सांगळे यांच्या पथकाने केली.

# SPOT NEWS

## पिंपळगाव टप्पा परिसरात घरफोडी करून सवा लाखांचा ऐवज लंपास

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यात चोरट्यांचा धुमाकूळ सुरूच असून दररोज घरफोडी, जबरी चोरी, रस्तालुट, चैन स्नॅचिंग, खिसे कापु, शेतातील शेती साहित्य, सोलर, मोटर चोरी व वाहन चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढच होत आहे. पोलिसांकडून कोणताच तपास होत नसल्याने व कारवाई होत नसल्याने चोरट्यांचे मनोधैर्य वाढले आहे तर सर्व सामान्य नागरिकांमध्ये घबराटीचे व संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यातील पिंपळगाव टप्पा येथे अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून सुमारे १ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शकीला बबन सय्यद (वय ५२, व्यवसाय – मजुरी, रा. पिंपळगाव टप्पा, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्या मोल मजुरी करून उदरनिर्वाह करतात. फिर्यादीनुसार, २ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे १० वाजता जेवण करून घराला बाहेरून कुलूप लावून कुटुंबीय एका खोलीत झोपले होते. ३ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे ७ वाजता उठल्यानंतर घराचे दुसऱ्या खोलीचे बाहेरील कुलूप तुटलेले दिसले. घरात प्रवेश करून पाहणी केली असता घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. तसेच लोखंडी कपाटातील रोकड व सोन्या-चांदीचे दागिने चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. चोरट्यांनी ५० हजार रुपये रोख, ११ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र किंमत ५० हजार रुपये, तसेच ३ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी आणि चांदीचे १० भाराचे पैजण किंमत २५ हजार रुपये असा एकूण १ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध पाथर्डी पोलिस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनास्थळाची पाहणी करून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच अन्य तांत्रिक बाबींच्या आधारे चोरट्यांचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

## मुख्य रस्त्यास आद्य क्रांतिगुरू वीर लहुजी वस्ताद साळवे मार्ग नामकरण

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

विश्वविख्यात साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीचे औचित्य साधून अहिल्यानगर शहरातील आद्य क्रांतिगुरू वीर लहुजी वस्ताद साळवे चौक ते सर्जेपुरा चौक या मुख्य रस्त्याचे अधिकृतपणे आद्य क्रांतिगुरू वीर लहुजी वस्ताद साळवे मार्ग असे नामकरण करण्यात आले. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात नामकरण फलकाचे अनावरण करण्यात आले. या ऐतिहासिक निर्णयामुळे मातंग समाजासह बहुजन समाजामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. महापालिकेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात शहराचे उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक निखिल वारे, अंकल ढवण यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. सत्यशोधक बहुजन आघाडी, गौरवशाली मातंग इतिहास संवर्धन संघटना आणि मातंग एकता आंदोलन यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या रस्त्याच्या नामकरणाचा निर्णय प्रत्यक्षात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आद्य क्रांतिगुरू वीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि क्रांतिकारी कार्याचा गौरव करताना त्यांच्या विचारांचे जतन करणे हीच खरी त्यांना अभिवादनाची भावना असल्याचे सांगितले.

## चापडगाव विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी, अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**विद्यार्थ्यांनी सामाजिक उत्तरदायित्वही जपावे : उपप्राचार्य जायभाये**



**● शेवगाव । वीरभूमी–**

विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच समाजाप्रती संवेदनशीलता, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक उत्तरदायित्व जपले पाहिजे. लोकमान्य टिळकांचे राष्ट्रप्रेम, नेतृत्वगुण आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची समतेची शिकवण आजच्या पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपप्राचार्य सुनील जायभाये यांनी केले.

विद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य संपत दसपुते, पर्यवेक्षक संजय दुधाडे, अशोक आघवणे, वत्सला जाधव, किरण गोरे, संजय मरकड, ज्ञानेश्वर आवारे, शरद सुपारे, दादासाहेब ज्योतीक आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य संपत दसपुते यांनी मनोगतात लोकमान्य टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे प्रेरणास्थान होते, तर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून आणि शाहिरीतून सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी केली, असे सांगितले.

शिक्षक प्रतिनिधी वत्सला जाधव आणि सुरेंद्र लोहकरे यांनी विद्यार्थ्यांना या दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या विचारांचा आदर्श घेऊन ज्ञान, प्रामाणिकपणा, परिश्रम, देशभक्ती आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये अंगीकारण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सर्जे राव निकाळजे यांनी केले, तर आभार शरद सुपारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## स्वच्छता ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी : अद्वैता शिरसाट

**बाबूजी आव्हाड महाविद्यालयात एनसीसीतर्फे स्वच्छता अभियानावर मार्गदर्शन**


छाया । अनिल खाटेर

**● पाथर्डी । वीरभूमी–**

स्वच्छता ही सर्वात महत्त्वाची सवय असून स्वच्छता आणि आरोग्य यांचा अतूट संबंध आहे. स्वच्छतेमुळे संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण मिळते तसेच शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. त्यामुळे घर, परिसर आणि देश स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन जर्मनीस्थित स्वच्छतादूत अद्वैता शिरसाट यांनी केले.

येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित स्वच्छता अभियान मार्गदर्शन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बबन चौरे होते. व्यासपीठावर विश्वस्त कुणाल आव्हाड, प्रतीक्षा आव्हाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. अरुण राख, पर्यवेक्षक प्रा. सलीम शेख तसेच प्रा. शेखर ससाणे उपस्थित होते.

अद्वैता शिरसाट म्हणाल्या की, भारत आणि जर्मनीच्या स्वच्छतेच्या संस्कृतीत मोठी तफावत असून परदेशात भारताची प्रतिमा अस्वच्छ देश अशी केली जाते. हे चित्र बदलण्यासाठी प्रत्येक नागरिकाने स्वतःपासून स्वच्छतेची सुरुवात करणे आवश्यक आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार अस्वच्छतेमुळे भारतात दररोज अनेक बालकांचा मृत्यू होतो. त्यामुळे स्वच्छतेबाबत जनजागृती आणि कृती दोन्ही आवश्यक आहेत.

त्या पुढे म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये सुरू केलेल्या ‘स्वच्छ भारत अभियानाला’ अपेक्षित लोकसहभाग अजूनही मिळालेला नाही. कोणतीही चांगली कृती सलग २१ दिवस केल्यास ती सवय बनते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने किमान २१ दिवस स्वतःचे घर व परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करावा.

यावेळी प्रा. मन्सूर शेख यांनी आयोजित केलेल्या इंग्लिश हँडरायटिंग स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अरुण राख यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. आशा पालवे यांनी, तर आभार प्रा. सचिन पालवे यांनी मानले.

## शेडगावच्या विकासकामांची राज्यस्तरावर दखल

# सौ. संध्या शेंडे यांना ‘सह्याद्रीरत्न गुणवंत गौरव’ सन्मान

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

ग्रामविकासाची संकल्पना केवळ रस्ते आणि मूलभूत सुविधांपुरती मर्यादित न ठेवता पर्यावरण संवर्धन, शिक्षण, सामाजिक ऐक्य आणि ग्रामस्थांच्या सहभागातून विविध उपक्रम राबविणाऱ्या शेडगाव ग्रामपंचायतीच्या कामाची विविध स्तरांवर दखल घेतली जात आहे. गेल्या दशकभरातील या विकासप्रवासात माजी सरपंच विजय शेंडे आणि माजी सरपंच सौ. संध्या विजय शेंडे यांचे योगदान राहिले आहे.

सन २०१५ ते २०२० या कालावधीत विजय शेंडे यांनी सरपंचपदाची जबाबदारी सांभाळली, तर २०२१ ते १८ ऑगस्ट २०२५ या कालावधीत सौ. संध्या शेंडे यांनी ग्रामपंचायतीचा कारभार पाहिला. या कालावधीत शेडगावमध्ये विविध विकासकामांना चालना देण्यात आली. गावातील वाड्या-वस्त्यांना जोडणारे पक्के रस्ते, वृक्षलागवड व पर्यावरण संवर्धन, सामाजिक सलोखा आणि तंटामुक्त गावासाठी प्रयत्न यांसह विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यामुळे गावाच्या मूलभूत सुविधांबरोबरच सामाजिक आणि पर्यावरणीय विकासालाही महत्त्व देण्यात आले.

शैक्षणिक क्षेत्रातही विविध उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची दिशा मिळावी, यासाठी विविध क्षेत्रातील अधिकारी तसेच यशस्वी व्यक्तींच्या मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, समता आणि बंधुभाव वाढविण्यासाठीही उपक्रम घेण्यात आले. गावातील तंटे स्थानिक पातळीवर सामोपचाराने सोडवून सामाजिक सलोखा कायम ठेवण्यासाठीही प्रयत्न करण्यात आले.

यात नुकतीच तोंडांत साखर पडावी असे ‘सह्याद्रीरत्न गुणवंत गौरव’ने कामाची नव्याने दखल घेण्यात आली आहे. शेडगावच्या विकासकामांमध्ये योगदान देणाऱ्या सौ. संध्या विजय शेंडे यांच्या कार्याची नुकतीच आणखी एका राज्यस्तरीय पुरस्काराने दखल घेण्यात आली आहे.

नालंदा ऑर्गनायझेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या सर्वेक्षणादरम्यान उत्कृष्ट कामगिरीबद्दल सौ. संध्या शेंडे यांची ‘आदर्श सरपंच’ म्हणून निवड करण्यात आली. त्याबद्दल त्यांना ‘सह्याद्रीरत्न गुणवंत गौरव सन्मान सोहळा २०२६’ मध्ये सन्मानित करण्यात आले.

दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी पुणे येथील पत्रकार भवन, नवी पेठ येथे झालेल्या कार्यक्रमात त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. या नव्या पुरस्कारामुळे शेडगावच्या ग्रामविकासाच्या कामाची पुन्हा एकदा व्यापक स्तरावर दखल घेतली गेली आहे.


छाया । विजय उंडे

यापूर्वीही सौ. संध्या शेंडे यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार मिळाला आहे. तसेच विजय शेंडे यांना ‘इंडियन पिनॅकल नॅशनल अवॉर्ड २०२४’ या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. विजय शेंडे यांनी सरपंच परिषद अध्यक्ष म्हणूनही काम केले आहे.

ग्रामपंचायतीच्या कारभारात सर्वांना संधी मिळावी आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तयारी करता यावी, या उद्देशाने सौ. संध्या शेंडे यांनी १८ ऑगस्ट २०२५ रोजी सरपंचपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर १० ऑक्टोबर २०२५ रोजी मंगला बाळासाहेब शेंडे यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाली.

गेल्या दहा वर्षांत शेडगावमध्ये राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांमुळे गावाच्या विकासाला एक वेगळी दिशा मिळाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. रस्ते, पर्यावरण, शिक्षण, सामाजिक सलोखा आणि ग्रामस्थांचा सहभाग या विविध क्षेत्रांत राबविण्यात आलेल्या उपक्रमांची आता पुरस्कारांच्या माध्यमातूनही दखल घेतली जात आहे.

# शहरहिताला प्राधान्य दिल्यास विकासाला गती मिळेल

## अरुण मुंढे । शेवगाव नगरपरिषदेच्या स्थलांतरित कार्यालयाचे उद्घाटन; नागरिकांची गैरसोय दूर होणार

**● शेवगाव । वीरभूमी–**
मला काय मिळाले, याचाच विचार करत बसलो असतो तर शहराचा विकास अंधारात राहिला असता. विकासाची कामे सर्वांच्या सहकार्यानेच पूर्ण होतात. खरे बोलणारे अनेकदा सर्वांना पटत नाहीत, त्यामुळे काही जण नाराज होतात. मात्र जनहित डोळ्यासमोर ठेवूनच निर्णय घेतले जातात. वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवून शहरहिताला प्राधान्य दिल्यास विकासाला गती मिळेल, असे प्रतिपादन शिवसेना नेते अरुण मुंढे यांनी केले.

शेवगाव नगरपरिषदेच्या नव्या जागेतील स्थलांतरित कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. ज्येष्ठ नागरिक मधुकर देवणे यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे माजी सभापती अरुण लांडे होते.

यावेळी नगराध्यक्षा माया मुंढे, मुख्याधिकारी विजया घाडगे, फिरस्ता संघाचे अध्यक्ष राधेश्याम तिवारी, श्री गुरुदेव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके, सचिव फुलचंद रोकडे, संजय फडके, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष अमोल सागडे, एकनाथ कुसळकर, विजय देशमुख, बाबूशेठ जाजू, अंबादास नाकाडे, प्रेमसुख जाजू, फिरोज पठाण, गोरक्ष कर्डीले आदी उपस्थित होते.

अरुण मुंढे म्हणाले की, शहराच्या पाणीपुरवठा योजनेच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात अनेक त्रुटी होत्या. त्या दूर करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले. नगराध्यक्षपदी माझी पत्नी असली तरी अनेक विकासकामांचा पाठपुरावा मला स्वतः करावा लागतो. हा पाठपुरावा कोणत्याही वैयक्तिक हितासाठी नसून नागरिकांच्या सोयी-सुविधांसाठी आहे.

शहराच्या विकासासाठी शॉपिंग कॉम्प्लेक्स, नाट्यगृह, दर्जेदार रस्ते, पाणीपुरवठा आणि इतर नागरी सुविधा उभारण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.



■ छाया । अमोल कराळे

गेल्या चार-पाच वर्षांपासून नगरपरिषदेचे कार्यालय शहराबाहेरील ठिकाणी असल्याने नागरिकांना विविध कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागत होता. कार्यालय पुन्हा शहरात स्थलांतरित करण्यासाठी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. त्यामुळे आता नागरिकांची गैरसोय मोठ्या प्रमाणात दूर होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी सुनील पगारे, अर्जुन बर्गे, जितेश मराठे, जगदीश जाधव, दिगंबर सापनर यांच्यासह कमलेश गांधी, रिजवान शेख, अमर शेख, नंदू मुंढे आणि ज्ञानेश्वर लिंगे यांनी मान्यवरांचा सत्कार केला. कार्यक्रमास नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी केले. सूत्रसंचालन दीपक कुसळकर यांनी, तर आभार संजय फडके यांनी मानले.

### नगरसेवकांच्या अनुपस्थितीची चर्चा

■ कार्यक्रम दिमाखदार वातावरणात पार पडला. मात्र, एक महिला व एक पुरुष नगरसेवक तसेच चार नगरसेविकांचे पती वगळता उपनगराध्यक्षांसह सुमारे २० नगरसेवक अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले. विशेष म्हणजे सत्ताधारी गटासह राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपचे अनेक नगरसेवक गैरहजर राहिल्याने आगामी काळात नगरपरिषदेत राजकीय संघर्ष तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# शिवप्रहार संघटनेकडून सोनाळवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**● पाथर्डी । वीरभूमी–**
शिवप्रहार संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त तसेच स्वातंत्र्यसैनिक क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून पाथर्डी तालुक्यातील अतिदुर्गम भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोनाळवाडी येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

शिवप्रहार संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष अमोल पाठक यांच्या संकल्पनेत आयोजित कार्यक्रमास तालुकाध्यक्ष सोमनाथ माने, स्वस्तिक वाचनालयाचे अध्यक्ष संदीप काटे तसेच सामाजिक कार्यकर्ते सुनील कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.



■ छाया । अनिल खाटेर

मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या, शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी संदीप काटे यांनी शिक्षणाचे महत्त्व, नियमित अभ्यास, वाचनाची सवय आणि जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक गुण याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शाळेचे शिक्षक दीपक बडे यांनी शाळेत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि गुणवत्ता वृद्धीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांमध्येही मोठी गुणवत्ता व क्षमता असल्याचे मान्यवरांनी यावेळी गौरवोद्गार काढले.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या शिक्षकांनी शिवप्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरित करणारा हा उपक्रम ग्रामीण भागातील शैक्षणिक चळवळीस बळ देणारा ठरला.

# चिंभळा उपबाजारात पहिल्याच दिवशी ७ हजार कांदा गोण्यांची आवक

## २३ ते ३० रुपये किलो दर । शेतकऱ्यांना लिलावाच्या दिवशीच रोख पेमेंट

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी दूरवर जावे लागू नये, यासाठी बाजार समितीच्या माध्यमातून दर १५ किलोमीटरच्या अंतरावर शेतीमाल विक्रीची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने काम सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चिंभळा उपबाजार समितीत कांदा लिलावाला सुरुवात झाली आहे. पहिल्याच दिवशी तब्बल ७ हजार कांदा गोण्यांची आवक झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



■ छाया । विजय उंडे

चिंभळा उपबाजारातील पहिल्या कांदा लिलावात कांद्याला २३ ते ३० रुपये प्रतिकिलो दर मिळाला. विशेष म्हणजे लिलाव झालेल्या कांद्याचे रोख पेमेंट त्याच दिवशी शेतकऱ्यांना करण्यात आले. त्यामुळे शेतमालाची विक्री, लिलाव आणि तत्काळ पैसे मिळण्याची सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

लिलावाची संपूर्ण प्रक्रिया बाजार समितीचे सचिव राजेंद्र लगड यांच्या देखरेखीखाली पार पडली. परिसरातील विविध गावांमधून शेतकरी कांदा घेऊन चिंभळा उपबाजारात दाखल झाले होते. पहिल्याच दिवशी झालेली मोठी आवक पाहता या उपबाजारामुळे परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना जवळच्या ठिकाणी बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.

यावेळी बाजार समितीचे संचालक रामदास झेंडे, लौकिक मेहता यांच्यासह इतर संचालक, शेतकरी आणि बाजार समितीचे कर्मचारी उपस्थित होते. व्यापाऱ्यांच्या वतीने दिलीप मेहता, रमेश बोरा, आशिष भंडारी, मयूर बोरा, दीपक भंडारी आणि गौरव पोखरणा यांनी लिलाव प्रक्रियेत सहभाग घेतला.

शेतकऱ्यांना जवळच्या ठिकाणी शेतमाल विक्रीची सुविधा उपलब्ध करून देण्यावर बाजार समितीचा भर असून, पेडगाव येथील केंद्र अधिक सक्षम करून कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे. तसेच पुढील दीड महिन्यात काष्टी येथेही कांदा बाजार पूर्ण क्षमतेने सुरू करण्याचा मानस असल्याचे बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे यांनी सांगितले.

> येणाऱ्या काळात शेतकऱ्यांच्या सोयीसाठी पेडगाव येथील केंद्र अधिक सक्षम करून कार्यान्वित केले जाईल. तसेच पुढील दीड महिन्यात काष्टी येथेही कांदा बाजार पूर्ण क्षमतेने सुरू करण्याचा आमचा मानस आहे. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव आणि वेळेवर पेमेंट देणे हीच आमची प्राथमिकता आहे.
>
> **– अतुल लोखंडे,** सभापती, श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समिती

# सुपा येथे व्यसनमुक्ती प्रतिज्ञा अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचा जनजागृती कार्यक्रम । व्यसनमुक्त समाज घडविण्याचा सामूहिक संकल्प

**● पारनेर । वीरभूमी –**
सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत वाढत्या व्यसनाधीनतेमुळे तरुण पिढी आणि समाजासमोर गंभीर आव्हान निर्माण झाले आहे. या समस्येवर जनजागृती करण्यासाठी सुपा येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या केंद्रातर्फे 'दहा कोटी नशा मुक्ती प्रतिज्ञा महाअभियान' अंतर्गत विशेष व्यसनमुक्ती प्रतिज्ञा व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

ब्रह्माकुमारी साधना दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमास परिसरातील नागरिक व अध्यात्मिक साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देवराम भाई, दिलीप भाई, लक्ष्मण भाई, बाळासाहेब पवार, प्रतिमा माता, सुनीता माता, मीना माता, सुषमा माता, पठारे माता यांच्यासह अनेकांनी व्यसनमुक्त समाज घडविण्याचा संकल्प केला.



■ छाया । भगवान गायकवाड

मार्गदर्शन करताना ब्रह्माकुमारी साधना दीदी म्हणाल्या की, वाढती व्यसनाधीनता विद्यार्थी, युवक आणि समाजासाठी गंभीर समस्या बनली आहे. लहानपणापासूनच व्यसनांबाबत जागरूकता निर्माण करून मूल्याधिष्ठित जीवनशैलीचा स्वीकार व्हावा, या उद्देशाने शिवदर्शनाच्या माध्यमातून 'दहा कोटी नशा मुक्ती प्रतिज्ञा अभियान' देशभर राबविण्यात येत आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, मानसिक तणावातून मुक्त होण्यासाठी अनेकजण व्यसनांचा आधार घेतात; मात्र व्यसनामुळे तणाव कमी न होता तो अधिक वाढतो. या दुष्टचक्रातून समाजाला बाहेर काढण्यासाठी ६ ते २० ऑगस्टदरम्यान 'नशा मुक्त भारत अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाद्वारे आतापर्यंत ४ कोटी नागरिकांपर्यंत पोहोचण्यात यश आले असून, त्यापैकी सुमारे ३ कोटींनी व्यसनमुक्त जीवनाचा संकल्प केला असल्याची माहिती त्यांनी दिली.

येत्या २५ ऑगस्ट रोजी मुख्य प्रशासिका दादी प्रकाशमनीजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त हे अभियान जनआंदोलन बनवून भारताला व्यसनमुक्त करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना व्यसनमुक्त राहण्याची तसेच इतरांनाही व्यसनमुक्तीसाठी प्रेरित करण्याची सामूहिक प्रतिज्ञा देण्यात आली.

# पाथर्डी तालुक्यातून १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता

## अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल

**● पाथर्डी । वीरभूमी–**
पाथर्डी तालुक्यातील तिसगाव येथून १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून, या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तिसगाव (ता. पाथर्डी) येथे वास्तव्यास असलेल्या रेखा जितेंद्र वाघ (वय ३२) यांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचे पती हे मंगळवारी सकाळी कामानिमित्त गावातील इतर ठिकाणी गेले होते. त्यावेळी त्यांची १५ वर्षीय मुलगी व मुलगा घरी होते.दुपारी जेवणासाठी घरी आल्यानंतर पुन्हा दोघेही कामावर गेले. सायंकाळी मुलाने आईला फोन करून बहिण बाहेर गेल्याचे सांगितले. त्यानंतर कुटुंबीयांनी नातेवाईकांसह परिसरात सर्वत्र शोध घेतला; मात्र मुलगी आढळून आली नाही.फिर्यादीच्या तक्रारीनुसार, अज्ञात व्यक्तीने मुलीला फूस लावून अथवा कोणत्यातरी आमिषाचे प्रलोभन दाखवून तिला पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून मुलीचा शोध घेण्यासाठी युद्धपातळीवर तपास सुरू आहे.बेपत्ता मुलीचे वर्णन असे : उंची सुमारे ५ फूट, अंगाने सडपातळ, वर्ण निमगोरा, चेहरा उभट, नाक सरळ, डोळे काळे, केस काळे व लांब असून कपाळाच्या रंगाची पंजाबी ड्रेस परिधान केलेला होता.या प्रकरणाचा पुढील तपास पाथर्डी पोलिस करीत आहेत.